# ‘फ्लिपकार्ट क्विक’च्या शुभारंभासह फ्लिपकार्टची अतिसूक्ष्म स्थानिक (हायपरलोकल) क्षमतानिर्मिती

- *बंगळुरूमधील निवडक ठिकाणांसह सुरुवात, फ्लिपकार्ट क्विकचा येत्या काही महिन्यांत सहा शहरांमध्ये विस्तार*
- *निवडक उत्पादनांसाठी ९० मिनिटांच्या आत डिलिव्हरी मॉडेलसह फ्लिपकार्ट क्विकमुळे सुरक्षित आणि विश्वासार्ह अनुभवासाठी भागिदार परिसंस्थेला चालना*
- *किराणा दुकानांना ई-कॉमर्सच्या प्रवाहात आणून त्यांच्या संगणकीकरणाला चालना देण्याची फ्लिपकार्ट क्विकची प्रचंड क्षमता*

**बंगळुरू - २८ जुलै २०२० :** संपूर्णत: भारतात विकसित झालेल्या फ्लिपकार्ट या ई-कॉमर्स बाजारपेठेने आज फ्लिपकार्ट क्विक या आपल्या अतिसूक्ष्म स्थानिक पातळीवरील (हायपरलोकल) सेवेचा शुभारंभ केला. आपली तंत्रज्ञानात्मक क्षमता आणि पुरवठा साखळी सुविधा यांच्या बळावर फ्लिपकार्टने फ्लिपकार्ट क्विक या सेवेची रचना केली आहे. निवड करण्यासाठी वैविध्यपूर्ण पर्याय, सर्वोत्तम गुणवत्ता आणि लोकेशन मॅपिंगची नवी तंत्रज्ञान चौकट यांच्या आधारे ग्राहकांना अभूतपूर्व असा अनुभव देणे हे फ्लिपकार्टचे उद्दिष्ट आहे. उत्पादनांच्या उपलब्धतेची चौकट अधिक व्यापक करून आणि ग्राहकांना अधिक वेगवान डिलिव्हरीसाठी त्यांच्या परिसरातील फ्लिपकार्ट हब्जमधून उत्पादनांची मागणी नोंदवण्याची संधी देऊन नव्या ग्राहकांपर्यंत पोहोचणे हे या हायपरलोकल डिलिव्हरी मॉडेलचे ध्येय आहे.

उत्पादनांपर्यंत पोहोचण्याची संधी, उत्पादनांची उपलब्धता आणि किफायतशीरपणाच्या अनुषंगाने ग्राहकांच्या दैनंदिन खरेदी अनुभवाला आधुनिक स्वरूप देताना फ्लिपकार्ट क्विक पहिल्या टप्प्यात ग्रोसरी, फ्रेश, डेअरी, मीट, मोबाइल्स, इलेक्ट्रॉनिक ॲक्सेसरीज, स्टेशनरी आयटम्स आणि होम ॲक्सेसरीज या श्रेणीतील दोन हजारांहून अधिक निवडक वस्तू ग्राहकांना उपलब्ध करून देणार आहे. ग्राहक आपल्या सोयीनुसार पुढील ९० मिनिटांत ऑर्डर नोंदवण्याचा किंवा दोन तासांच्या कालावधीची नोंद करण्याचा पर्याय स्वीकारू शकतात. ग्राहक दिवसातल्या कुठल्याही वेळी ऑर्डर नोंदवू शकतात आणि सकाळी सहा ते मध्यरात्री पर्यंत आपल्या नोंदणीनुसार डिलिव्हरी घेऊ शकतात. किमान डिलिव्हरी फीची सुरुवात २९ रुपयांपासून आहे.

या शुभारंभाबाबत फ्लिपकार्टचे उपाध्यक्ष संदीप कारवा म्हणाले, *“स्थानिक पातळीवर उपलब्ध उत्पादने आणि एका विशिष्ट विभागातील ग्राहक यांना परस्परांशी जोडणे म्हणजे अतिसूक्ष्म स्थानिक क्षमता अशी हायपरलोकल कपॅबिलिटीची साधी व्याख्या करता येईल. भारतातील प्रत्येक घर आपल्या परिसरातील किराणा दुकानाशी जोडलेले असल्यामुळे हे भारतासाठी अत्यंत उत्तम असे मॉडेल आहे. किंबहुना, ज्याला आपण हायपरलोकल कंटेक्स्ट म्हणजे अतिसूक्ष्म स्थानिक संदर्भ म्हणतो, त्याच्याशी भारतीय कुटुंब इतके*

*परिचयाचे आहेत की, विक्रेते, दुकानदार आणि सेवा पुरवठादारांशी अत्यंत खोल, कौटुंबिक बंध निर्माण करण्याकडे त्यांचा कल असतो आणि आता ई-कॉमर्सच्या सोयीमुळे ही बाब अधिकच सुलभ होणार आहे. डार्क स्टोअर मॉडेलपासून (नो वॉक इन - प्रत्यक्ष येऊन खरेदीला प्रतिबंध) आम्ही सुरुवात करत असून ज्यात विक्रेत्यांना ग्राहकांच्या जवळच्या परिसरात आपल्या उत्पादनांची साठवणूक करता येईल. या मॉडेलमध्ये स्थानिक पातळीवरील उद्योजकतेला वाव मिळून उद्योगविषयक नवी धोरणे आणि भागिदाऱ्यांनाही चालना देण्याची क्षमता आहे. आज फ्लिपकार्ट क्विक या आमच्या हायपरलोकल क्षमतेमुळे परिसरातील सर्व किराणा दुकानांचे जाळे केवळ एका क्लिकसरशी आमच्या व्यासपीठावर आणण्याची आमची क्षमता आहे."*

व्हाइटफिल्ड, पनाथुर, एचएसआर लेआऊट, बीटीएम लेआऊट, बनशंकरी, के. आर. पुरम आणि इंदिरा नगर अशा निवडक ठिकाणांसह बंगळुरूमधून फ्लिपकार्ट क्विकची सुरुवात होत आहे.

*फ्लिपकार्ट क्विक* अंक्षाश-रेखांशाच्या आधारे सेवा पुरवणार असल्यामुळे वितरण स्थानाची ओळख अधिक अचूकपणे होण्याबरोबरच डिलिव्हरीसाठीच्या वेळेतही बचत होईल. वितरण स्थानाची ओळख पटवण्यासाठी पिनकोडचा वापर करण्याच्या पारंपरिक पद्धतीत अधिक व्यापक परिसर व्याप्त होतो. त्याऐवजी फ्लिपकार्ट क्विट लोकेशन मॅपिंगसाठी अधिक कल्पक आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणार आहे. या तंत्रज्ञानामुळे अंतिम टप्प्यातील वितरण प्रक्रिया गतिमान होईलच, शिवाय पत्त्याचा शोध घेण्याची यंत्रणा अधिक बिनचूक होऊन पत्ता न सापडणे किंवा पुन्हा डिलिव्हरी करण्याची वेळ येणे असे प्रकार कमी होतील.

गेल्या दोन वर्षांपासून भारतातील ऑनलाइन, तसेच ऑफलाइन रिटेल क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल होत आहेत. परंतु, गेल्या ५० दिवसांत अधिक चापल्य आणि कार्यक्षमतेसह कल्पक पर्याय आणि व्यवसाय प्रारूप विकसित होताना आपण पाहिले. साथीच्या आजाराच्या या वर्षातील सहा महिने उलटून गेले असताना पुरवठा साखळीतही आमूलाग्र बदल झाले आहेत. अनेकांसाठी अत्यंत सोयीची म्हणून ओळखली जाणारी अतिसूक्ष्म स्थानिक (हायपरलोकल) श्रेणी आता भारतात दीर्घकालीन अत्यावश्यक सेवा म्हणून रूढ होत आहे. ग्राहकांची मानसिकता आणि अपेक्षांमध्ये यामुळे लक्षणीय बदल झाला असून २०२०च्या अखेरीपर्यंत भारतीय हायपरलोकल बाजारपेठ २,३०६ कोटी रुपयांचा टप्पा ओलांडेल आणि या बाजारपेठेचा सीएजीआर लक्षणीय असेल, असा अंदाज आहे (कोव्हिडपूर्व अनुमान).

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and PhonePe. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants and small businesses to be a part of India's e-commerce revolution, with a registered customer base of over 200 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access

and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs has driven us to innovate on many industry firsts. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, and PhonePe, India’s fastest growing digital payments platform, the Flipkart Group is steering the transformation of commerce in India through technology.

**For media queries, contact [media@flipkart.com](mailto:media@flipkart.com).**